# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.१२३/२०२६

**विषय :-** भारताची जनगणना २०२७ या कामकाजासंदर्भात.

**संदर्भ :-** परिपत्रक क्र.९६/२०२६, जा.क्र.एएन/१९६५, दिनांक २५ मे, २०२६.

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, भारताची जनगणना २०२७ या कामकाजाकरिता पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडून विद्यापीठ आस्थापनेतील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना आदेश प्राप्त झाले होते. सदर भारताची जनगणना २०२७ कामकाजाचे आदेश विद्यापीठ कार्यालयास सादर करणे व इतर तद्नुषंगिक बार्बीबाबत संदर्भीय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते. पुणे महानगरपालिकेमार्फत भारताची जनगणना २०२७ या कामकाजाकरिता यंत्रणा उभी केली होती. त्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आस्थापनेतील संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांचा हा कर्तव्यदक्ष सहभाग अतिशय मोलाचा असाच आहे. शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजातील आपल्या नेहमीच्या जबाबदाऱ्या तितक्याच कालबध्दतेने पार पाडून संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांनी भारताची जनगणना २०२७ च्या कामकाजात केलेले हे योगदान अतिशय स्तुत्य व अभिनंदनीय आहे. खरे तर सामाजिक उत्तरदायित्तवाची भावना विद्यापीठातील सर्वच घटकांमध्ये सातत्याने दिसून येते. या उत्तरदायित्वाच्या समूहभावनेला असेच सातत्य लाभावे आणि ते अधिकाधिक समाजाभिमुख व्हावे. यासाठी आपण माहे मे, २०२६ व जून, २०२६ या दरम्यान पार पाडलेली जबाबदारी व आपल्या कर्तव्यदक्ष सहभाग अतिशय महत्त्वाचा आणि उल्लेखनीय असून सदर जनगणनेचे आपण कामकाज पूर्ण केलेले आहे. त्या अनुषंगाने संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्या सर्वांचे विद्यापीठ प्रशासनाकडून मन:पूर्वक अभिनंदन.

सदर जनगणना विषयक कामकाज पूर्ण झाल्यानंतर संबंधित काही शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी हे विद्यापीठ कार्यालयात रुजू झालेले असून त्या अनुषंगिक कार्यमुक्त आदेश विद्यापीठ प्रशासनास सादर केलेले आहेत. मात्र काही संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी हे अद्यापही विद्यापीठामध्ये रुजू न झाल्याची बाब विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आलेली आहे.

सबब, जे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी विद्यापीठ कार्यालयात रुजू झालेले नाहीत, अशा संबंधितांनी त्यांच्यासंदर्भात विद्यापीठ कार्यालयामध्ये रुजू न होण्याविषयकची माहिती तात्काळ उपकुलसचिव, प्रशासन शिक्षक / शिक्षकेतर कक्षास अवगत करावी.

उपरोक्त अभावी सदर शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रजा आणि इतर बार्बीची पूर्तता करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 2523
दिनांक : 08 JUL 2026

**( प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार )**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

यांना विनंती की, सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.